Shikshan Mandal Karad's

# Mahila Mahavidyalaya, Karad

## General Ability Test

## B.A.I Sociology

**Date: 06/12/2022** **Total Marks : 30**

---

**Q1) Choose the correct alternative for the following questions.**
**खालील प्रश्नांसाठी दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा.**

१. मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे' असे कोणी म्हटले आहे.
A) हर्बर्ट स्पेन्सर B) कार्ल मार्क्स C) एमिल डूरखीम D) ॲरिस स्टोटल

२. ऑगस्त कॉम्त यांनी कोणत्या लॅटीन व ग्रीक शब्दापासून समाजशास्त्र हि संज्ञा निर्माण ............केलेली आहे.
A ) Socious and Logos B ) Society and Logos
C ) Social and Logos D ) Relation and Logos

३. "सामाजिक संबंध हा समाजशास्त्राचा मुख्य अभ्यासाविषय आहे", असे कोणी म्हटले ..........आहे.
A ) किंग्जले डेव्हीस B ) मॅक आयव्हर आणि पेज
C ) हर्बर्ट स्पेन्सर D ) जॉन लॉक

४. खालीलपैकी समाजशास्त्राचा अभ्यासविषय कोणता आहे.
A ) मानवाच्या सामाजिक वर्तनाचा अभ्यास B ) अखिल मानव समाज
C ) विविध मानव समाज व समूह D ) वरील सर्व

५. जेंव्हा एका व्यक्तीच्या वर्तनाचा किमान दुसऱ्या एखाद्या व्यक्तीच्या वर्तनावर प्रभाव पडतो त्यावेळी कशाची निर्मिती होते.
A ) समाज B ) संस्कृती C ) सामाजिक आंतरक्रिया D ) विवाह

६. 'ज्यावेळी दोन किंवा अधिक व्यक्ती केवळ एकमेकांच्या सानिध्यात आल्यामुळे त्यांच्यात आंतरक्रिया घडून येते,आंतरक्रिया करण्याचा कोणताही हेतू मनामध्ये ठेवून त्या एकत्र आलेल्या नसतात,अशा आंतराक्रीयाना ............ म्हणून ओळखले जाते.'

A ) प्रत्यक्ष आंतरक्रिया B ) अप्रत्यक्ष आंतरक्रिया
C ) केंद्रीभूत आंतरक्रिया D ) अकेंद्रीभूत आंतरक्रिया

७. 'दर्जा म्हणजे एखाद्या विशिष्ठ समाजव्यवस्थेत विशिष्ठ काळी एखाद्या विशिष्ठ व्यक्तीला असलेले स्थान होय.' असे कोणी म्हटले आहे.

A ) राल्फ लिंटन B ) पार्सन्स C ) मदन व मजुमदार D ) जॉर्ज मिड

८. पुढीलपैकी सामाजिक नियमनाचे कोण कोणते प्रकार आहेत.

A ) लोकरूढी B ) लोकनीती C ) कायदा D ) वरील सर्व

९. "व्यक्तीच्या वर्तनाविषयी समूहाच्या असणाऱ्या अपेक्षा म्हणजे .......... होय."

A ) दर्जा B ) सामाजिक नियमने C ) सामाजिक मुल्ये D ) भूमिका

१०. कौशल्य,ज्ञान,शिक्षण,परिश्रम यासारख्या वैशिष्ट्यांच्या आधारावर व्यक्तीने संपादित केलेल्या दर्जाना कोणत्या प्रकारचे दर्जे म्हटले जाते.

A ) अर्पित दर्जा B ) अर्जित दर्जा C ) स्व दर्जा D ) अनावश्यक दर्जा

११. व्यक्तीच्या परस्परांच्या अस्तित्वाच्या जाणीवेतून जे संबंध निर्माण होतात त्यांना ....... असे म्हणतात.

A ) जैविक संबंध B ) नैसर्गिक संबंध C ) सामाजिक संबंध D ) भौतिक संबंध

१२. ............ व ................ ही मानवसमाजाची प्रभेदक लक्षणे आहेत.

A ) बुद्धी व वाचा याचा अभाव B ) रीतीरिवाज व आचार पद्धती याचा अभाव

C ) प्रजोत्पादन व स्वतंत्रतेचा अभाव D ) निश्चित भूप्रदेश व व्यापक संस्कृती

१३. ............ हा मानव समाजाचा प्रारंभीचा टप्पा / प्रकार म्हणून ओळखला जातो.

A) शिकार व अन्नसंकलन समाज B) बागायती समाज

C) पशुपालक समाज D) कृषक समाज

१४. समाजीकरण हि एक ........ चालणारी प्रक्रिया आहे.

A) कालबाह्य B) निरंतर C) अल्पकाळ D) व्यक्तिगत

१५. शारीरिक मानव प्राण्याचे रुपांतर सामाजिक मानव प्राण्यात करणारी प्रक्रिया म्हणजे ............... होय.

A) समाजीकरण B) सामाजिक आंतरक्रिया

C) नैसर्गिकरण D) यापैकी नाही